क्रमांक : १३५३ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २५ जानेवारी, २०२४

: : **कार्यालयीन आदेश** : :

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, शुक्रवार, दिनांक २६ जानेवारी, २०२४ रोजी **"भारतीय प्रजासत्ताक दिन"** निमित्त सार्वजनिक सुट्टी आहे. तथापि, लोकसभा सचिवालयामार्फत ८४ वी अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषद (AIPOC) व सचिवांची ६० वी परिषद, विधान भवन, मुंबई येथे दिनांक २७ ते दिनांक २९ जानेवारी, २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. उक्त परिषदेच्या कामकाजाच्या अनुषंगाने कामाचा आवाका लक्षात घेता गठीत करण्यात आलेल्या समित्यांवरील सर्व संबंधित समिती प्रमुखांसह समितीमध्ये समाविष्ट असलेले अधिकारी/कर्मचारी यांनी कामकाजाच्या निकडीनुसार कार्यालयात उक्त दिवशी उपस्थित रहावे.

त्याचप्रमाणे शनिवार, दिनांक २७ जानेवारी, २०२४ व रविवार, दिनांक २८ जानेवारी, २०२४ रोजी सार्वजनिक सुट्टी असली तरी सदरहू परिषदेच्या कामकाजाच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय सुरु राहील. तसेच शुक्रवार, दिनांक २६ जानेवारी, २०२४ ते सोमवार, दिनांक २९ जानेवारी, २०२४ रोजी पर्यंत कार्यालयाची कार्यालयीन वेळ सकाळी ७.५५ वा. राहील.

आदेशानुसार,

**( सुभाष नलावडे )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) मा.सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) मा.सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
७) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
८) सर्व समिती प्रमुख यांची कार्यालये.
९) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.



\\mls-dataserver\C Branch\1401\C-101\Local Disk (d)\E Drive\2024\AIPOC COMMITTEE\CIRCULAR.docx

११) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.

१२) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१३) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (सदरहू आदेश या सचिवालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.)

१४) निवडनस्ती.

**प्रतिलिपी :-**

१) उप अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

२) शाखा अभियंता (स्थापत्य), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.